23 JUN 2017
पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डांगे महाविद्यालयाचा विद्यापीठास अभिमान

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे : स्वायत्ततेचे प्रमाणपत्र प्रदान

**आष्टा / प्रतिनिधी :**

अण्णासाहेब डांगे महाविद्यालयाने शैक्षणिक क्षेत्रात केलेले प्रामाणिक प्रयत्न आणि त्यासाठी घेतलेले कष्ट यामुळेच या संकुलाची शैक्षणिक गुणवत्ता सातत्याने वाढत राहिली. त्यासाठी अण्णासाहेब डांगे यांनी पाहिलेले स्वप्न आणि नजरेत असलेले ध्येय कारणीभूत आहे. येथील गुणवत्तेमुळेच स्वायत्त दर्जा प्राप्त झाला असून, शिवाजी विद्यापीठासाठी अभिमानाची गोष्ट असल्याची भावना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केली.

अण्णासाहेब डांगे अभियांत्रिकी महाविद्यालयास स्वायत्त दर्जा प्राप्त झाला. त्याचे प्रमाणपत्र विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते संस्थापक अण्णासाहेब डांगे यांना प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अण्णासाहेब डांगे होते. स्वागत महाविद्यालयाचे कार्यकारी संचालक प्रा. आर. ए. कनाई यांनी केले.

डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, केवळ नुसते कष्ट करूनही एखादी गोष्ट साध्य होत नाही. त्यासाठी सर्वसमावेशक भूमिका असावी लागते. ती येथील व्यवस्थापनाकडे दिसून येते. महाविद्यालयाने तशा पद्धतीने कामही केले आहे. प्रत्येक कामात सुयोग्य नियोजन असल्यामुळे या शैक्षणिक संकुलातील विविध संस्थांना यापूर्वी आयएसओ मानांकनही प्राप्त झाले आहे हे येथे फिरताना पावलोपावली दिसून येते.




आष्टा : येथील अण्णासाहेब डांगे अभियांत्रिकी महाविद्यालयाला स्वायत्ततेचे प्रमाणपत्र प्रदान करताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. सोबत अण्णासाहेब डांगे, चिमण डांगे, प्राचार्य मुल्ला.

डॉ. शिंदे म्हणाले, गुणवत्ता वाढीसाठी येथील प्रत्येकाचे योगदान महत्त्वाचे आहे. गेल्या वर्षभरात येथील २५० संशोधन पेपर प्रसिद्ध झाले आहेत. ही थक्क करणारी गोष्ट आहे. जगात सर्वात जास्त तरुणांचा देश म्हणून भारताची ओळख बनत आहे. तरुणांसाठी तंत्रज्ञान योगीपेक्षा गरजेचे बनले आहे. त्यामुळेच संपूर्ण जग तंत्रज्ञानावर सुरू आहे. ही नवी जीवन पद्धती बनत आहे.

शिक्षणात नवप्रवाह आले असून त्यासाठी एकत्रित वाटचाल केली तरच आपण जगाशी नाळ जोडू शकू, असा आशावादही डॉ. शिंदे यांनी मांडताना डांगे अभियांत्रिकी महाविद्यालयास मिळालेला स्वायत्त दर्जा अण्णासाहेब डांगे यांच्या दूरदृष्टीचा आणि शैक्षणिक कर्तृत्वाचा मोठा सन्मान मानला पाहिजे आणि ही बाब शिवाजी विद्यापीठासाठी आम्ही अभिमानाची मानतो, असे गौरवोद्‌गार डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले.

अण्णासाहेब डांगे म्हणाले, शासनाचे शैक्षणिक धोरणच लक्षात येत नाही. शासकीय आणि खासगी शैक्षणिक संस्थांच्या बाबतीत का पक्षपात करण्यात येतो. अभियांत्रिकीची पदवी घेतलेल्या अभियंत्यांना वर्षभर कामाच्या ठिकाणी प्रशिक्षण घ्यावे लागते. त्यासाठी गुणवत्ता असलेले अभियंते निर्माण केले पाहिजेत, असे असताना शासनाने राज्यातील सहा शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांना यापूर्वीच स्वायत्त केले. मग खासगी महाविद्यालयांच्या बाबतीत मात्र का पक्षपात केला जातो, असा सवाल डांगे यांनी उपस्थित केला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शैक्षणिक संकुलाची पाहणी केली. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात प्राचार्य डॉ. मुल्ला यांनी उपस्थितांना शैक्षणिक कार्याचा आढावा दिला. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. संपतराव पाटील, सचिव ॲड. चिमण डांगे, उपप्राचार्य एल. वाय. वाघमोडे, डॉ. एन. डी. सांगळे, प्रा. शैलेंद्र हिवरेकर, प्रा. संतोष मोहिते, सुनील शिनगारे, दीपक आडसूळ, परेश पाटील, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. ॲड. संपतराव पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUN 2017

पुढारी



कोल्हापूर : केआयटीचे डॉ. महेश चव्हाण यांना प्रमाणपत्र देताना कल्लाप्पाण्णा आवाडे. सोबत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. महेश काकडे आदी.

# शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्तीमध्ये केआयटी प्रथम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोल्हापूर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कोल्हापूरला शिवाजी विद्यापीठ, गुणवत्ता शिष्यवृती २०१७ मध्ये ग्रामीण गटात अभियांत्रिकी विभागात प्रथम क्रमांक मिळाला. इचलकरंजी येथे झालेल्या कार्यमक्रमात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, परीक्षा व मूल्यांकन संचालक डॉ. महेश काकडे व कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या हस्ते केआयटीचे अधिष्ठाता डॉ. महेश चव्हाण यांना प्रमाणपत्र व स्मृतिभेट देऊन सन्मानित करण्यात आले. गेल्या दहापेक्षा जास्त वर्षांपासून केआयटी हे पारितोषिक सलगपणे पटावित आहे.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, महाविद्यालयामध्ये गुणवत्ता आहे, हे सिद्ध करण्यासाठी संशोधन प्रकल्पावर भर द्यावा लागेल. विद्यार्थ्यांना विविध उपक्रमांची माहिती द्यावी लागेल. प्राचार्यांनी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना संशोधनासाठी प्रेरीत करावे. केआयटीने नॅक 'ए' मानांकन, दोन वेळा एनबीए मानांकन, विद्यापीठाची कायमस्वरूपी संलग्नता व आता स्वायत्त (ॲटोनॉमस) असा दर्जा मिळाल्याने विद्यार्थी व पालकांमधून केआयटीचे कौतुक होत आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष सचिन मेनन, उपाध्यक्ष भरत पाटील, सचिव साजिद हुदली आणि विश्वस्त यांनी प्राचार्य डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी व त्यांच्या सहकाऱ्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

2 3 JUN 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठ गुणवत्तेत डॉ. घाळी कॉलेजचा कॉमर्स विभाग प्रथम

गडहिंग्लज / प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेत डॉ. घाळी कॉलेजने सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात निमशहरी विभागातून वाणिज्य शाखेत प्रथम क्रमांक प्राप्त केला.

बी. कॉम. भाग एक ते बी. कॉम. भाग तीनपर्यंतच्या गुणवंत प्राप्त विद्यार्थीनी मृणाल कुलकर्णी, श्रृती कानडे, दीपाली मोरे, दीपाली संभाजी, पुष्पा पाटील, स्नेहा दड्डीकर, शीतल नंद्याई, श्वेता गोईलकर, लक्ष्मी शिंदे, पुष्पांजली शेट्यान्नावर, हीना कमते, वर्षा खाडे, रसिका माळी, सानिया मनियार या विद्यार्थिनींना त्यांच्या यशाबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते व माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे यांच्या अध्यक्षतेखाली डीकेटीई कॉलेज इचलकरंजी येथे झालेल्या कार्यक्रमात सन्मान पत्र देण्यात आले.




गडहिंग्लज : डॉ. एम. आर. पाटील यांना प्रशस्तिपत्र देताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. उपस्थित सपना आवाडे, डॉ. एम. डी. पुजारी, डॉ. महेश काकडे यांच्यासह अन्य.

यावेळी परीक्षा नियंत्रक डॉ. महेश काकडे, सपना आवाडे, प्राचार्य डॉ. मंगलकुमार पाटील, डॉ. एम. डी. पुजारी, डॉ. एन. बी. मासाळ, प्रा. एन. ए. स्वामी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य पाटील म्हणाले, डॉ. घाळी कॉलेज जरी निमशहरी गटात येत असले, तरी या महाविद्यालयात शिक्षण घेणारे विद्यार्थी व विद्यार्थिनी अतिशय दुर्गम भागातून व वाड्या वस्तीतून गडहिंग्लजपर्यंत येतात. त्यामुळे या विद्यार्थिनींनी मिळवलेले यश केवळ महाविद्यालयाचाच नव्हे, तर शिवाजी विद्यापीठाचासुद्धा नावलौकिक वाढविणारे आहे. या विद्यार्थिनींच्या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्षा रत्नमाला घाळी, कार्याध्यक्ष डॉ. सतीश घाळी यांच्यासह संचालकांनी अभिनंदन केले.

23 JUN 2017

Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

VARSITY INTRODUCES 13 NEW STUDY CENTERS | ONLINE STORE TOO

# Online bookstore for pupils

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) inaugurated its e-book store earlier last week in the presence of SUK vice-chancellor Devanand Shinde.

Shinde said, "The publication department of the SUK has published many quality works till date, the demand for which is not only from within the country but also from across the world. At present the most sought after books have been put on the e-store and soon other books will be available too."

D T Shirke, acting pro vice-chancellor of SUK, told **TOI** that it has been a long-standing complaint of avid readers from across the state and the nation that the books that are published by the SUK are not available elsewhere. He said, "With the creation of e-store portal, we have now given them the opportunity to order books online and pay through online transaction."

He added, "An online payment gateway facility has been provided which will facilitate a smooth purchasing experience."

# Admission for distance courses begins at SUK

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The admission process for Shivaji University, Kolhapur's (SUK) Centre for Distance Education began from Thursday.

According to a SUK official, apart from regular study centres in urban areas, the centre has introduced 13 new study centres from this academic year that fall in semi-urban and rural areas.

The official added that among the 13 study centres, seven study centres are in Kolhapur district, while three each in Sangli and Satara districts.

With the addition of 13 centres, the total numbers of study centres in the division has gone up to 60.

"The available courses in the centre for distance education are useful for working individuals, businessmen, housewives, students, farmers or anyone who is interested in pursuing the studies," he said.

"Courses like BA, BCom, MA, MCom, MBA and PG diploma in translation are some of the courses which are popular among students. The fee of these courses is very nominal when compared with colleges and its validity is as same as the degree from a college or a university department," he added.

File Photo



The total number of study centres in the division is 60

The official said that considering the first year undergraduate admission crisis in the division, the students should not wait for getting things clear and rather opt for admission in distance education courses.

"This way they can save their academic year and continue their studies without any kind of gap," he said.

The degree from distance education department is valid for employment purpose, for competitive exams, and for getting promotion and hence one should not undermine the usage of this degree.

M A Anuse, centre director, said the students should reserve their admissions for the given courses at the earliest.

# CAP panel yet to decide on admission

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Centralised Admission Process (CAP) committee is yet to decide the schedule for Class XI admissions.

N D Pardhi, assistant director at the deputy director of education office told **TOI**, a Pune-based company has been awarded the tender for printing class XI admission forms and they will be made available soon.

He added that unless the date for the availability of forms is confirmed, the office cannot reveal the date of admissions.

The working president of CAP committee N V Nalawade said forms are still being printed and are not yet ready to meet demand.

He said that a meeting of the CAP committee members has been organised today, where details regarding the upcoming schedule is likely to be finalised.

Considering the delay in the process this year, it is likely that the counselling sessions of the students, parents and staff members is likely to start from June 27 onwards and once the counselling ends, the distribuion and collection of forms will commence.

Another official from the CAP committee said the procedure could have been started earlier, but in the absence of a date for Class X marksheet distribution and three consecutive holidays from June 24 to June 26 has resulted in the delay in the admission process.

BENNETT UNIVERSITY
GET THE IVY LEAGUE EDGE
www.bennett.edu.in
ADMISSIONS OPEN

**Considering the delay in the process this year, it is likely that the counselling sessions of the students, parents and staff members is likely to start from June 27 onwards and once the counselling ends, the distribuion and collection of forms will commence**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUN 2017
पुढारी

# दूरशिक्षणाची नवीन १३ अभ्यासकेंद्रे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

गृहिणी, नोकरदार, शेतकरी, सैनिक, कामगार, कैदी यांच्यासाठी शिवाजी विद्यापीठाने मुद्रित अध्ययन साहित्य, दृकश्राव्य साहित्य, संपर्क सत्राची सुविधा उपलब्ध करून दूरशिक्षण केंद्राची स्थापना केली आहे. याव्दारे बी. ए., बी. कॉम, एम. ए., एम. कॉम, एम. बी. ए. (दूरशिक्षण) आदी अभ्यासक्रमांचे शिक्षण दिले जाते.

दूरशिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे. त्यामुळे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात १३ नवीन अभ्यासकेंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. यामुळे दूरशिक्षण केंद्रांची संख्या ६० इतकी झाली आहे, अशी माहिती दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी केली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUN 2017
पुढारी

# दूरशिक्षण केंद्राचे प्रवेश सुरू

**कोल्हापूर :** उच्च शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे, या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाचे दूरशिक्षण केंद्र कार्यरत आहे. २०१७-१८ साठी दूरशिक्षण केंद्रामार्फत सुरू असणाऱ्या बी. ए. , बी कॉम. अशा पदवी स्तरावरील तसेच एम. ए., एम. कॉम. एम. बी. ए., एम. एस्सी. (गणित), पी. जी. डिप्लोमा इन ट्रान्सलेशन, आदी पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया २२ जून २०१७ पासून सुरू होत आहे. या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी केले आहे.

2 3 JUN 2017
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण केंद्रांतर्गत तेरा अभ्यासकेंद्रांना मान्यता

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण केंद्रांतर्गत संकलित महाविद्यालयामध्ये यंदा अभ्यासकेंद्राच्या संख्येतवाढ झाली आहे. यावर्षी नवीन १३ अभ्यासकेंद्रांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यामध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील ७, सांगली ३ व सातारा ३ अभ्यासकेंद्रांचा समावेश आहे. आता एकूण दूरशिक्षण केंद्राच्या अभ्यासकेंद्रांची संख्या ६० इतकी झाली आहे. शिवाजी विद्यापीठांतर्गत संलग्नित महाविद्यालयाने आवश्यक माहितीची पूर्तता करून प्रस्ताव दिल्यास, विद्यापीठामार्फत संबंधित महाविद्यालयात दूरशिक्षण अभ्यासकेंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात येईल, असे पत्रक दूरशिक्षणचे संचालक, प्रा. डॉ. एम. ए. अनुसे यांनी



प्रसिद्ध केले आहे.

शिवाजी विद्यापीठात दूरशिक्षण केंद्राची स्थापना बहिस्थ विद्यार्थ्यांसाठी केली आहे. दूरशिक्षणच्या माध्यमातून गृहिणी, नोकरदार, सैनिक, उद्योजक, शेतकरी, कामगार, कैदी शिक्षण घेतात. दूरशिक्षण केंद्र विद्यार्थ्यांना मुद्रित अध्ययन साहित्य, दृकश्राव्य साहित्य, सपंर्क सत्राची सुविधा उपलब्ध करून देते. दूर शिक्षणकेंद्रांतर्गत बी.ए, बी.कॉम, एम.ए., एम.कॉम, एम.बी.ए, (डिस्टन्स मोड/ एक्झिकेटिव्ह मोड) आदी अभ्यासक्रम आहेत. धावपळीच्या जीवनात दूरशिक्षण केंद्रातील अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा कल वाढत आहे.

**कोल्हापूर जिल्ह्यामधील अभ्यासकेंद्र :** श्रीमती आक्काताई रामागोंडा पाटील कन्या महाविद्यालय, इचलकरंजी, श्री. लहू बाळा परितकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, पणोरे, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज, श्री. संत गाडगेबाब महाविद्यालय, कापशी, गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज, कोल्हापूर, आर्टस् कॉलेज, कोवाड, ता. चंदगड, दूधसाखर महाविद्यालय, बिद्री. याठिकाणी नवीन अभ्यासकेंद्रे होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUN 2017
सकाळ

# विधी पदवीसाठी प्रतितुकडी ६० विद्यार्थी करण्यास मान्यता



कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात विधी पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता प्रती तुकडी साठ विद्यार्थी करण्यास मान्यता देण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस आज शिफारस केली. विद्या परिषदेच्या बैठकीत ही शिफारस केली. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते. यंदापासून नव्याने सुरू होणाऱ्या एम. एस्सी. (क्वॉन्टिटेटिव्ह इकॉनॉमिक्स) कोर्ससाठी बी. ए./बी. कॉम. वुईथ इकॉनॉमिक्स बीबीए, बीसीए, बी.एस्सी फिजिक्स, स्टॅटिस्टिक्स, मॅथ्स, कॉम्प्युटर सायन्स अशी पात्रता निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर २०१७-१८ ते २०२१-२२ दरम्यान, नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यासक्रमबाबतची ठिकाणे निश्चित करण्यासाठी नवीन सम्यक योजनेचा बृहत आराखडा मान्य करण्याबाबत अधिसभेस शिफारस केली. या वेळी कुलसचिव डॉ. विलास नादंवडेकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

23 JUN 2017
लोकमत

# नव्या अभ्यासक्रमाच्या पात्रतेस मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : एम.एस्सी.च्या 'क्वांटिटेटिव्ह इकॉनॉमिक्स' या नव्या अभ्यासक्रमाची पात्रता निश्चित करण्यास शिवाजी विद्यापीठ विद्या परिषदेने गुरुवारी मान्यता दिली. विद्यापीठातील कुलगुरू कार्यालयात विद्या परिषदेची बैठक झाली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, तर सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते. बैठकीत शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ पासून नव्याने सुरु होणाऱ्या 'एम. एस्सी. क्वांटिटेटिव्ह इकॉनॉमिक्स' या अभ्यासक्रमासाठी बी.ए., बी. कॉम.सह इकॉनॉमिक्स विषय, बी.बी.ए., बी.सी.ए., बी.एस्सी. इन फिजिक्स, मॅथ्स, कॉम्प्युटर सायन्स अशी पात्रता निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली. शैक्षणिक वर्ष सन २०१७-१८ ते २०२१-२२ या कालावधीचा नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यासक्रम, आदींबाबतची ठिकाणे निश्चित करण्याबाबत योजनेचा आराखडा मान्य करण्याबाबत अधिसभेला शिफारस केली. विधी पदवी अभ्यासक्रमांची प्रवेशक्षमता प्रतितुकडी ६० विद्यार्थी करण्यास मान्यता देण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 JUN 2017
पुढारी

# विद्यापीठाचा बृहत आराखडा मान्य करण्याची अधिसभेस शिफारस

## विद्यापरिषद बैठकीत विविध विषयांना मान्यता

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०१७-१८ ते २१-२२ या पाच वर्षांच्या कालावधीचा नवीन अभ्यासक्रम, महाविद्यालये आदी निश्चित करण्याबाबत नवीन सम्यक योजनेचा आराखडा (बृहत आराखडा) अधिसभेने मान्य करावा, अशी शिफारस गुरुवारी शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत करण्यात आली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे तर सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते. बैठक शिवाजी विद्यापीठाच्या कार्यालयात झाली.

बैठकीत महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या निर्णयानुसार विधी पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश क्षमता प्रती तुकडी ६० विद्यार्थी करण्यासंदर्भात बैठकीत शिफारस करण्यात आली. यासह यंदाच्या शैक्षणिक वर्षांपासून नव्याने सुरू होणा-या एमएस्सी (क्वाँटीटिव्ह इकॉनॉमिक्स) या कोर्ससाठी बी.ए., बी.कॉम. (इकॉनॉमिक्स विषयासह), बीबीए, बीसीए, बीएस्सी (फिजिक्स, स्टॅटॅस्टिक्स), मॅथस, कॉम्प्युटर सायन्स अशी पात्रता निश्चित करण्यात आल्याबाबत मान्यता देण्यात आली.